सांकेतिक कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्रमांक २०१-बी, रोड क्र. १, प्लॉट क्र. बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र-४००६०४.

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय बँकचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदारांस सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा त्याला/तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रूल्सच्या नियम ८ अन्वये खालील नमूद तारखेस घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या भाराअधीन राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	मिळकतीचे वर्णन/ सांकेतिक कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
१.	विकी भानुदास भाडळे आणि तेजल विकास भाडळे-एलबीपीयूएन००००५७६५४२३ आणि एलबीपीयूएन००००५७८०५७७	फ्लॅट क्र. ६०३, ६वा मजला, बिल्डिंग क्यु, वंडरसिटी सहकारी गृह रचना संस्था मर्यादित, सर्व्हे क्र. ७५/१ए, ७५/२ए, ७५/३ए आणि ७५/४ए, मौजे कात्रज, तालुका हवेली, कात्रज डेरी जवळ, अंडर ग्राऊंड ब्रीज जवळ, महाराष्ट्र, पुणे-४११०४६/ जुलै १६, २०२४.	१४ मार्च २०२४ रु. ५१,७०,२४३.००/-	पुणे
२.	पंकज कृष्ण कुमार सिंग आणि श्वेत क्रिशम सिंग-एलबीएमयूएम००००५३९००४० आणि एलबीएमयूएम००००५३९००४२	फ्लॅट क्र. ००१, तळमजला, आर२-विंग, उत्कर्ष रेसिडेन्सी, जयदीप टॉवर समोर, बी केबिन रोड, सीटीएस क्र. ९२९९/४, मोरिवली, अंबरनाथ पूर्व, ठाणे-४२१५०१/ जुलै १६, २०२४.	१६ डिसेंबर २०२३ रु. १६,५५,६२५.९८/-	मुंबई
३.	सोनाली पंकज खिंवसरा आणि पंकज हिरालाल खिंवसरा-एलबीपीयूएन००००३४९८६११	फ्लॅट क्र. ७०४, ७वा मजला, ए विंग, अरिहंत प्रथमेश, सर्व्हे क्र. ३५, हिस्सा क्र. ३ (विभाग क्र. ४७/६२६), कोंढवे बुद्रुक, तालुका हवेली, खाडी मशिन चौक जवळ, महाराष्ट्र, पुणे-४११०४४/ जुलै १६, २०२४.	०२ नोव्हेंबर २०२३ रु. १६,०४,४२८.००/-	पुणे
४.	पंकज हिरालाल खिंवसरा आणि सोनाली पंकज खिंवसरा-एलबीपीयूएन००००५२०५६१४	फ्लॅट क्र. ७०४, ७वा मजला, ए विंग, अरिहंत प्रथमेश, सर्व्हे क्र. ३५, हिस्सा क्र. ३ (विभाग क्र. ४७/६२६), कोंढवे बुद्रुक, तालुका हवेली, खाडी मशिन चौक जवळ, महाराष्ट्र, पुणे-४११०४४/ जुलै १६, २०२४.	०२ नोव्हेंबर २०२३ रु. १६,२४,५१३.००/-	पुणे
५.	इलियास चितासाब खैरडी आणि समीना इलियास खैरडी-एलबीपीयूएन००००११०९४४८	फ्लॅट क्र. २०४, २रा मजला, ए विंग, ईशा हाईट, सर्व्हे क्र. ४६, हिस्सा क्र. ५, १४/१२, ६, गाव कोंढवे खुर्द, तालुका हवेली, महाराष्ट्र, पुणे-४११०४८/ जुलै १६, २०२४.	०५ एप्रिल २०२४ रु. ३,५५,७९९/-	पुणे
६.	फिरोज आर शेख आणि सना हैदर अली शेख-एलबीटीएनई००००५२१०४९४	फ्लॅट क्र. ५०६, ५वा मजला, सी विंग, दोस्ती रूबी, दोस्ती रूबी (प्लॅनेट नॉर्थ) को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., दोस्ती प्लॅनेट नॉर्थ, भारत गॅस कंपनी जवळ, शिळ कल्याण रोड, सर्व्हे क्र. १४८/१, १५०/१, १५५/१, १५५/२, १५६, १५९, १६०/५, १८१/२ए, १८२, १५७, १५८/१, १६०/४, १६१/२, झोन क्र. २४/९२-१५, गाव शिळ, ठाणे-४००६१२/ जुलै १६, २०२४.	०२ एप्रिल २०२४ रु. ३६,५६,२५०/-	ठाणे

वरील नमूद कर्जदार/हमीदार यांना रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत तरतुदींनुसार सदर सूचना प्रसिध्दी तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर गहाण मिळकतीची विक्री करण्यात येईल.

दिनांक : जुलै २०, २०२४
ठिकाण: महाराष्ट्र

प्रामाणिकपणे प्राधिकृत स्वाक्षरीकार
आयसीआयसीआय बँक लि. करीता

इंडियन ओव्हरसीज बँक

ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच
मेकर टॉवर ई, ५ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५.
दू.- ०२२-२२१७४१७५/०२२-२२१७४१७६, ईमेल: iob1998@iob.in

स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी ई-लिलावाकरिता जाहीर सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (क्र. ५४ सन २००२) अन्वये बँकेकडे गहाण स्थावर मिळकतीची विक्री.

ज्याअर्थी, इंडियन ओव्हरसीज बँक संघ म्हणजेच इंडियन ओव्हरसिस बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, तमिलनाड मर्कंटाईल बँक लि. आणि करुर वैश्य बँकच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी येथील खालील तपशिलानुसार बँकेची थकबाकी आणि व्याज आणि खर्चाच्या वसुलीकरिता **'जे आहे जेथे आहे तत्त्वाने आणि जे आहे जसे आहे तत्त्वाने'** तत्वावर त्या विक्रीच्या अधिकारासह कर्ज खात्यामध्ये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत जारी केलेल्या सूचनेनुसार खालील परिशिष्ट मध्ये नमूद मिळकतींचा कब्जा घेतला आहे आणि ज्याअर्थी त्यांनी थकबाकी चुकती करण्यास कसूर केल्यामुळे निम्नस्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टच्या कलम १३(४) अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून सदर मिळकतीच्या विक्रीद्वारे बँकेच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी प्रस्तावित आहेत. विक्री वेबपोर्टल www.mstcecommerce.com येथे पुरविलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

कर्जदाराचे नाव आणि पत्ता :

मे. प्लॅटीनम टेक्टाईल लिमिटेड (आता मे. श्रीवल्लभ पिटी साऊथवेस्ट इंडस्ट्रीज लिमिटेड नावे ज्ञात)
पत्ता: ९७ आणि ९९, मेकर टॉवर एफ कफ परेड, मुंबई ४०० ००५
तसेच येथे
एस एफ क्र. ९५६/१बी, ९६६/ए२, ९६६/ए३, ९६६/ए१, डोअर क्र. ११७, पलानी उदूमालपेट रोड मे कालीस्वारी रिफायनरी समोर, थालायुथु गाव, पलानी तालूका, दिंडिगुल जिल्हा ६२४६१८, तमिळनाडू
एस एफ क्र. ६/१ भाग, ६/२, ६/३ भाग, ८/१, ८/२, ८/३, ८/४ भाग, ८/५ भाग, ९/१ भाग, ९/३, ९/४, १०/१, १०/२, १०/३ भाग, थिरुवदनाई गाव, पी के मंगमलम पंचायत, तामनाड्र जिल्हा ६०३ ४०७
६२ए, मेकर टॉवर एफ कफ परेड, मुंबई ४०० ००५

हमीदार/गहाणदाराचे नाव आणि पत्ता:-

मे. चिराग पिटी (हमीदार)
६१/७१ विकास वैभव सीएचएसएल, ६ वा मजला,
३१ पेद्दार रोड, मुंबई ४०० ०२६
तसेच येथे
जमीन धारक खासरा क्र. ६६२, ६६२/१, ६६३, ६६४, ६६६ स्थित येथे नव भारत गृह निर्माण सहकारी समिती लि. गाव गेवा तहशील आणि जिल्हा जोधपूर ३४२००१
फ्लॅट क्र. ६१, ६ वा मजला आणि फ्लॅट क्र. ७१, ७ वा मजला, विकास वैभव सीएचएसएल, कंबाला हिल पोस्ट ऑफिस, ३१ पेद्दार रोड, मुंबई ४०० ०२६.

ऊटी मिल्स प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट हमीदार)
मिल प्रिमायसेस क्र. ५००, चिन्नामाथामपालायम, बिलिची पोस्ट, कोईंबतूर ६४१०१९, तमिळनाडू

मे. अश्विनी कृष्णा टेक्स्टाईल प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट हमीदार)
मिल प्रिमायसेस क्र. ५००, चिन्नामाथामपालायम, बिलिची पोस्ट, कोईंबतूर ६४१०१९, तमिळनाडू
तसेच येथे
नोंदणीकृत ऑफिस क्र. १३, जोसेफ मेन्शन, हिमांशू रॉय रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४.

मे. सिट्रोन इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड (कॉर्पोरेट हमीदार)
९७, मेकर टॉवर एफ, कफ परेड, मुंबई ४०० ००५
तसेच येथे
६२ए, मेकर टॉवर एफ, कफ परेड, मुंबई ४०० ००५

मे. एसव्हीपी टेक्टाईल्स व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट हमीदार)
नोंदणीकृत ऑफिस क्र. १३, जोसेफ मेन्शन, हिमांशू रॉय रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०० ०६४
तसेच येथे
ऑफिस क्र. ०७, जी विंग, विनी हाईट्स, मंथन हॉटेल समोर, नालासोपारा पश्चिम, ठाणे ४०१ २०३, महाराष्ट्र
खासरा क्र. ६५२/१ आणि खासरा क्र. ६५२
गाव खेजराला, तहशील बिलारा
जिल्हा जोधपूर ३४२६०१

मे. श्रीवल्लभ पिटी एन्टरप्रायजेस प्रायव्हेट लिमिटेड
९७, मेकर टॉवर एफ, कफ परेड, मुंबई ४०० ००५

अनु क्र.	तारण धनकोचे नाव	मागणी सूचना तारिख	मागणी सूचनेतील मागवलेली रक्कम (रु. यात)	एकूण थकीत रोजीस *
१	इंडियन ओव्हरसिस बँक	२४.११.२०२२	६९,३८,७८,२३९.००	३१.१०.२०२२
२	सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया	२२.०७.२०२२	५२,८५,८४,९२७.५१	२१.०७.२०२२
३	पंजाब नॅशनल बँक	११.०४.२०२२	३५,१०,९०,६९२.७२	३१.०३.२०२२
४	बँक ऑफ महाराष्ट्र	०१.०८.२०२२	४७,०५,६१,०९५.००	३१.०७.२०२२
५	युनियन बँक ऑफ इंडिया	१९.१०.२०२२	१३,१८,७२,५१७.९५	३०.०९.२०२२
६	तमिळनाड मर्कंटाईल बँक लि.	११.०८.२०२२	१४,४८,४५,९०९.३९	३१.०७.२०२२
७	करुर वैश्य बँक	०९.११.२०२२	६,८८,५०,२११.७३	३१.१०.२०२२

कब्जा सूचनेची तारिख: ३०.०६.२०२३
कब्जा सूचनेमध्ये दावा केलेली देय: ३१.०५.२०२३ रोजीस रु. २६५,०४,०६,२९६.१७ (रुपये दोनशे पासष्ट करोड चार लाख सहा हजार दोनशे शह्याण्णव आणि पैसे सतरा मात्र) सह पुढील व्याज आणि प्रभार.
*** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या थकीत देय (मालमत्ता कर, पाणी, सांडपाणी, विज बिल इत्यादी) - बँकेला कोणताही दावा माहित नाही.** खरेदीदार/यशस्वी बोलीदार यांनी संबंधीत प्राधिकरण/सोसायटीकडून थकीत निश्चित करावीत आणि ती पूर्ण भरणे आवश्यक आहे.

मिळकतीचे परिशिष्ट

स्थावर मिळकतीचे तपशिल	राखीव किंमत वगळून १% टीडीएस (रु.)	इसारा अनामत रक्कम (इअर) रु. यात	मिळकत आयडी
इंडस्ट्रीअल जमीन स्थित येथे खासरा क्र. ६५२/१, मोजमापित अंदाजे १३ बिघा ७ बिस्वा १० बिस्वान्शी आणि खासरा क्र. ६५२ (मिनिट) मोजमापित अंदाजे ८ बिघा स्थित येथे गाव खेजारला, तहशील: बिलारा, जिल्हा जोधपूर, एसव्हीपी टेक्स्टाईल व्हेंचर्स प्रा. लि. द्वारे मालकीचे.	९३,७८,५००/-	९,३७,८५०/-	IOBA1998SVP1

लिलावाची तपशील

ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**१४.०८.२०२४ रोजी स. ११ ते दु. १ दरम्यान** विक्री पूर्ण होईपर्यंत प्रत्येकी पाच मिनिटांच्या आपोआप विस्तारासह
इअरचा भरणा	वरील उल्लेखित इसारा अनामत रक्कम (इअर) ही बीडर्स ग्लोबल वॉलेट मध्ये एनईएफटी/आरटीजीएस (www.mstcecommerce.com) वरुन चलन निर्माण झाल्यानंतर ऑनलाईन भरणा करावा एनईएफटी/आरटीजीएस कोणत्याही शेड्युल्ड कमर्शिअल बँकेकडून हस्तांतर करु शकता.
बोली वाढविणे	**रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र)**
मिळकतीचे निरीक्षण	**०९.०८.२०२४ रोजी दु. ३.०० ते सायं. ५.०० दरम्यान (आधी वेळ ठरवून)**
इअरसह बोलीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे सुरू	२४.०७.२०२४
ज्ञात बोजा काही असल्यास	बँकेला निश्चित ज्ञात नाही. सदर मिळकत जे आहे जसे आहे, जे आहे जेथे आहे आणि जे काही आहे तेथे आहे तत्वावर विक्री करण्यात येतील.खरेदीदाराने संबंधीत प्राधिकरण/सोसायटीकडून थकीत निश्चित करावा आणि तो पूर्ण सोसावा.
*स्थानिक स्वराज्य संस्थेची थकबाकी (मिळकत कर, जलनिःस्सारण, वीज बिल्स इ.	बँकेला कोणताही दावा माहित नाही.

लिलावाचा तपशिल:
*** सांविधिक थकबाकीपेक्षा बँकेच्या थकबाकीला प्राधान्य**
*** बोलीदारांनी प्रस्तावीत बोली वाढविण्यानुसार राखीव किंमतीवर बोली लावावी.**
अटी आणि शर्ती करिता कृपया भेट:
१) https://www.ibapi.in
२) http://www.mstcecommerce.com,
३) www.iob.in

कानागा प्रताप सिंग
(प्राधिकृत अधिकारी)
इंडियन ओव्हरसीस बँक

दिनांक: १९.०७.२०२४
ठिकाण: मुंबई

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)

एरियन मुव्ही प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहीतीकरीता

संबंधित तपशील

१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**एरियन मुव्ही प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड**
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	२७/११/२०१८
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/ नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनी प्रबंधक - मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर	**यु७४११०एमएच२०१८पीटीसी३१७४५८**
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	८वा मजला, ८०३/८०४, लोटस ग्रॅण्ड्युअर, वीरा देसाई रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०००५३.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख	**जुलै १९, २०२४** एनसीएलटी, मुंबई बेंचने सीपी(आयबी)/९९/(एमबी)/२०२४ दिनांक **जुलै १९, २०२४** रोजीस आदेश मंजुर केला. **जुलै २०, २०२४** रोजीस अंतरिम निर्णय व्यावसायिकाद्वारे आदेश प्राप्त झाला.
७	नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख	**जानेवारी १७, २०२५** (सीआयआरपी च्या सुरूवातीच्या तारखेपासून १८० दिवस म्हणजेच **जुलै २०, २०२४**
८	अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	**टु आयपीई प्रायव्हेट लिमिटेड आयबीबीआय/आयपीई-०१५१/आयपीए-१/२०२३-२४/५००५२ एएफए ३०/०६/२०२५ पर्यंत वैध.**
९	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकांचा पत्ता आणि ई-मेल	डी-५०१, गणेश मेरिडियन, उच्च न्यायालयाच्या समोर, एस. जी. रोड, अहमदाबाद-३८००६०. **ई-मेल : cirp.arion@gmail.com, jain_cp@yahoo.com;**
१०	अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	११२, १ला मजला, रेक्स चेंबर, बॅलार्ड इस्टेट, वालचंद हिरा चंद मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१. **ई-मेल : cirp.arion@gmail.com, jain_cp@yahoo.com;**
११	दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख	**ऑगस्ट ०३, २०२४** म्हणजेच **जुलै २०, २०२४** रोजीस सीआयआरपी आदेशाच्या नियुक्ती तारखेपासून १४ दिवस.
१२	अंतरिम निर्णय व्यावसायिकांनी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास	सध्या प्रयोज्य नाही
१३	एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	सध्या प्रयोज्य नाही
१४	(ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	१) वेबलिंक : www.ibbi.gov.in/home/downloads २) प्रत्यक्ष कब्जा : बाब क्र. १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे ३) ईमेल आयआरपी येथे : **cirp.arion@gmail.com, jain_cp@yahoo.com;** ४) वेबसाईट येथे : **www.t-ipe.com** प्रयोज्य नाही

याद्वारे सूचना देण्यांत येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण ने **जुलै १९, २०२४** दिनांकित आदेशाद्वारे **एरियन मुव्ही प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड** ची एक कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले. जुलै १९, २०२४ रोजीस अंतरिम निर्णय व्यावसायिकांद्वारे आदेश प्राप्त झाला.

एरियन मुव्ही प्रॉडक्शन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे नोंद क्र. १० समोरील पत्त्यावर अंतरिम निर्णय व्यावसायीकांकडे **ऑगस्ट ०३, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी** त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यात येते.

वित्तीय धनकोंनी फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचा पुरावा सादर करावा. अन्य सर्व धनको व्यक्तीश, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुराव्यासह दावे सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर सूचिबद्ध केल्याप्रमाणे एखाद्या वर्गातील वित्तीय धनकोंनी फॉर्म सीए मधील वर्गाचे (सध्या एकही नाही) प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्याकरिता नोंद क्र. १३ समोर सूचिबद्ध केलेल्या तीन नादार व्यावसायिकांमधून प्राधिकृत प्रतिनिधींची त्यांची पसंती कळवावी.

दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.

चंद्र प्रकाश जैन
पूर्ण वेळ संचालक
मे. टु आयपीई प्रा. लि. करीता, मे. ट्युलिप ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड
चे अंतरिम निर्णय व्यावसायिक
आयबीबीआय क्र. आयबीबीआय/आयपीई-०१५१/आयपीए-१/२०२३-२४/५००५२
३०.०६.२०२५ पर्यंत एएफए वैध

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१.०७.२०२४

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India

विरार पूर्व शाखा :- गोकुळ प्लाझा, १ला मजला, कार्यालय १०७, रेल्वे क्रासिंगसमोर, लावड वाडी, विरार (पू.), ४०१ ३०५, **फोन क्र.** ०२५०-२५२००३७.
फॅक्स क्र. ०२५०-२५२००३७.
ईमेल: bmthan0641@centralbank.co.in

कर्जदारांना मागणी सूचना **दिनांक : ०८/०७/२०२४**

प्रति,
श्री. निलेश गणेश राव, पत्ता:- फ्लॅट क्र. सी/४०३, ४था मजला, कैलाश दर्शन को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., अचोले रोड, पंचम पार्कच्या समोर- नालासोपारा पूर्व- ४०१२०९

विषय : कर्जदारांना सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी ॲक्ट) च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना.

निम्नस्वाक्षरीकार हे सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेंट सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर संक्षिप्तासाठी 'सरफैसी ॲक्ट' असा उल्लेख) अंतर्गत सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारीच्या त्यांचे क्षमतेत मुख्य व्यवस्थापक चे पद धारण करणारे तुम्हाला सदर सूचना याद्वारे जारी करत आहेत.

तुम्हाला माहिती आहे की तुमच्या विनंतीनुसार तुम्हाला याखालील परिशिष्ट ए च्या तपशिलवार **रकाना १ ते २ मधील नमूद वित्तीय सहाय्यता** तिच्या **विरार पूर्व शाखेमार्फत** सेंट्रल बँक ऑफ इंडिया (यानंतर 'बँक' असा उल्लेख) द्वारे मंजुर करण्यात आली.

ही सदर वित्तीय सहाय्यता मिळकतीच्या तपशिलासह **परिशिष्ट 'बी'** मध्ये नमूद/तपशिलानुसार अन्य बाबीसह तारण दस्तावेज निष्पादित करून बँकेच्या नावे तारण हितसंबंध बनवून मंजूर करण्यात आली होती.

की, तुम्ही खाते चालवत नाही आणि मंजुरीच्या अटींनुसार बँकेची थकबाकी परत केली नाही आणि परिणामी, वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या प्रयोज्य मार्गदर्शक तत्त्वांनुसार तुमच्या खात्याचे **२८/०९/२०१९** पासून नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण करण्यात आले. बँकेने वारंवार विनंती करूनही, तुम्ही बँकेची थकबाकी भरण्यात अयशस्वी झाला आहात.

तुमच्याकडून देय रकमेचा सुविधानिहाय तपशील येथील परिशिष्ट ए च्या **रकाना ३ ते ९ मध्ये नमूद केला आहे. परिशिष्ट ए च्या ३ ते ९ मध्ये** नमुद करण्यात आला आहे. विविध वित्तीय सुविधांच्या अंतर्गत देय असलेल्या सर्व रकमेची बेरीज म्हणून तुमच्यावर देय असलेली एकूण **रु. ३७,६२,४३८/- म्हणजेच सदतीस लाख बासष्ट हजार चारशे अडतीस मात्र** इतकी आहे आणि तुम्ही संपूर्ण सदर रकमेची परतफेड करण्यात कसूर केली आहे.

म्हणून, तुम्हाला सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसात कायद्यानुसार आणि/किंवा केंत्राटाच्या अटींनुसार तुमच्याकडुन वसुलीयोग्य अनुषंगिक खर्च, प्रभार आणि परिव्ययासह संपूर्ण आणि अंतिम प्रदानाच्या तारखेपर्यंत सूचनेची तारीख ०८/०७/२०२४ पासून परिशिष्ट ए मध्ये नमुद प्रयोज्य व्याजाच्या दराने पुढील व्याजासह **रु. ३७,६२,४३८/- म्हणजेच सदतीस लाख बासष्ट हजार चारशे अडतीस मात्र** अशी संपूर्ण थकबाकी रक्कम भरून तुमचे दायित्व निभावण्यासाठी सरफैसी ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये बोलाविण्यात येत आहे.

तुम्ही बँकेची थकबाकी परत करण्यात कसूर केल्यास जे तुम्हाला वर देण्याचे आवाहन केले आहे, बँक सरफैसी ॲक्ट सहवाचता त्याअंतर्गत स्थापित नियमांच्या तरतुदींच्या अंतर्गत उपलब्ध सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करेल.

तुम्हाला ही सुध्दा सूचना देण्यात येते की कलम १३(१३) नुसार, तुम्ही बँकेची लेखी पुर्व संमती घेतल्याशिवाय विक्री किंवा अन्य मार्गाने परिशिष्ट 'बी' मध्ये तपशीलवार तारण मत्ता हस्तांतर न करण्यासाठी कायदेशीररित्या बांधील आहात.

सरफैसी ॲक्टच्या कलम २९ कडेही तुमचे लक्ष वेधण्यात येत आहे ज्यात असे नमूद केले आहे की या सरफैसी ॲक्टच्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन केल्यास एक वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

मागणीची ही नोटीस पूर्वग्रह न ठेवता जारी केली जात आहे आणि बँकेने आधीच वापरलेल्या आणि/किंवा वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही इतर अधिकारांचा किंवा उपायांचा माफी म्हणून अर्थ लावला जाणार नाही, ज्यामध्ये नमूद थकबाकीच्या वसुलीसाठी कोणत्याही कायदेशीर कारवाईचा समावेश आहे आणि पुढील मागण्यांसाठी सापडलेली/पडणारी आणि तुम्ही आम्हाला देय असलेली रक्कम.

तुमचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफैसी ॲक्टच्या कलम १३(८) च्य तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

(प्राधिकृत अधिकारी)

परिशिष्ट 'ए':- मंजूर आणि घेतलेल्या वित्तीय सुविधांचा तपशील आणि देय रकमेचा तपशील

अनु. क्र.	तपशील	
१.	मंजूर आणि घेतलेल्या आर्थिक सुविधेचा प्रकार	३९८६४२५७१५ सेंट होम फ्लोटिंग
२.	मंजूर आर्थिक सुविधेची रक्कम	२६०००००.००/-
३.	सूचनेच्या तारखेला थकबाकी असलेली लेजर बॅलन्सची एकूण रक्कम	२५४०९०९/-
४.	लेजर मध्ये व्याज आकारण्यात आलेली तारीख	०८/०७/२०२४
५.	दंडात्मक व्याज वगळून व्याजाची रक्कम, जर असेल तर, लेजरमध्ये शेवटचे व्याज आकारले गेल्याच्या तारखेपासून ..... सूचना दिनांक पर्यंत	१२२१५२९/-
६.	चक्रवाढीच्या कालावधीसह व्याज दर ज्यावर रकाना (५) मधील रक्कम मोजली गेली आहे	८.७५%
७.	दंडात्मक व्याजाची रक्कम ज्या तारखेपासून दंडात्मक व्याज आकारले गेले त्या तारखेपासून चक्रवाढ न करता आकारण्यात आलेली रक्कम.	६३२१९/-
८.	कायद्यानुसार/मंजुरीच्या अटींनुसार अनुषंगिक खर्च, शुल्क आणि खर्च, जर असेल तर	००
९.	नोटिस झाल्याच्या तारखेपर्यंत एकूण देय रक्कम (दंड व्याजाशिवाय)	३७६२४३८/-

परिशिष्ट 'बी'(कर्जदारद्वारे निष्पादित तारण दस्तावेजांची तपशिल)

अनु. क्र.	कागदपत्राचे नाव	निष्पादित तारीख
१.	कर्ज करार	३१-०३-२०१७
२.	व्याज बदलाचे पत्र	३१-०३-२०१७
३.	कर्जदाराचे संमतीपत्र	३१-०३-२०१७
४.	हमीदाराचे संमतीपत्र	३१-०३-२०१७
५.	साधारणपणे ॲडव्हान्स आणि क्रेडिट्ससाठी गॅरंटी	३१-०३-२०१७

परिशिष्ट 'सी'
(तारण मत्ता / गहाण ठेवलेली मिळकत/ जंगम गहाण वस्तू चे तपशिलवार विवरण)

स्थावर मत्ता:- फ्लॅट क्र. सी/४०३, ४था मजला, कैलाश दर्शन को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., अचोले रोड, पंचम पार्कच्या समोर- नालासोपारा पूर्व- ४०१२०९.

जंगम मत्ता :- लागू नाही

(प्राधिकृत अधिकारी)
जोडलेले : खात्याचे विवरण

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मध्ये
एमटीएनएल भवन, ३रा मजला, स्ट्रँड रोड, अपोलो बंदर, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४०० ००५
मूळ अर्ज क्र. ८०१ सन २०२३

परि. ११

एचडीएफसी बँक लि. ...अर्जदार
विरुद्ध
अरूण सुभाषचंद त्रिपाठी आणि इतर ...प्रतिवादी

समन्स

ज्याअर्थी, **ओ.ए.क्र. ८०१ सन २०२३** सन्माननिय पीठासीन अधिकाऱ्यांसमोर **०६.११.२०२३** रोजी सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ४०,६७,५९५.६७ पै.** च्या (अर्ज दस्तावेजांच्या प्रतिंसह संलग्न) कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या सदर ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जार